पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७०० E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

---

**प्रेसनोट** दिनांक :- ३०/०१/२०२४

# इगतपुरी तालुक्यातील खंबाळेवाडी येथील मुलीवर अत्याचार करणा-या नराधमास १० वर्ष सक्त मजुरीची शिक्षा

---

दिनांक ३०/०१/२०२४ रोजी नाशिक जिल्हा सत्र न्यायालयातील जिल्हा सत्र न्यायाधीश श्री. खरात सो. पोक्सो कोर्ट यांचे न्यायालयात घोटी पोलीस ठाणे गुरनं ५९/२०२१ भादवि कलम ३७६(१), ३२३, ५०४ प्रमाणे दाखल खटल्याची सुनावणी पुर्ण होवून सदर गुन्हयातील **आरोपी** नामे **हिरामण रामचंद्र तिटकारे,** वय ५० वर्षे, रा. खंबाळेवाडी, ता. इगतपुरी, जि.नाशिक याचेविरूध्द आरोप सिध्द झाल्याने मा. न्यायालयाने सदर आरोपीतास भादवि कलम ३७६ खाली १० वर्षे सक्त मजुरी व १,०००/- रूपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने सक्त मजुरी अशी शिक्षा सुनावली आहे.

सदरची घटना दि. ०१/०२/२०२१ रोजी आठ दिवसानंतर व दि. २७/०३/२०२१ रोजी रात्रीचे सुमारास फिर्यादीचे राहते घरात खंबाळेवाडी, ता. इगतपुरी येथे घडलेली होती. सदर गुन्हयातील आरोपी नामे हिरामण रामचंद्र तिटकारे, रा. खंबाळेवाडी, ता. इगतपुरी याने पिडीत ही रात्री घरात झोपलेली लाईट बंद करून तिचेवर बळजबरीने शरिरसंबंध केले. पिडीतेने आरडा-आरोडा केल्यावर आरोपीने पिडीत व साक्षीदार यांना मारहान व शिवीगाळ केली होती.

सदर गुन्हयाचा तपास घोटी पोलीस ठाणेस नेमणूकीस असलेले तत्कालीन सहा.पोलीस निरीक्षक श्री. जालिंदर पळे यांनी केला होता. त्यांनी आरोपीविरूध्द भक्कम पुरावे गोळा करून मा.सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्री. अनिल पी.बागले तसेच पैरवी अधिकारी म्हणुन सपोउनि पी.एस.दराडे यांनी काम पाहीले.